## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

# मराठी विज्ञानकथालेखन कार्यशाळेचे विद्यापीठात आयोजन

अमरावती :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मराठी विभाग आणि मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आठवी विज्ञानकथालेखन कार्यशाळा दि. ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०१८ या कालावधीत सकाळी १०.३० ते ५.३० या वेळेत विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात आयोजित केली आहे. विज्ञानकथेविषयी ज्यांना आवड आहे, जे विज्ञानकथालेखन करू इच्छितात त्यांना या कार्यशाळेत प्रवेश देण्यात येईल. नवोदित लेखक, अभ्यासक, विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी अशा सर्वांसाठी ही कार्यशाळा खुली असेल. इच्छूक व्यक्तींनी मराठी विभागात कार्यशाळेसाठी नाव नोंदवावे. त्यांना मराठी विज्ञान परिषदेने पाठविलेल्या दोन विज्ञानकथा देण्यात येतील. त्या वाचून त्यांना एक विज्ञानकथा लिहून आणावी लागेल. ती कथा मराठी विभागात दि. २५ ऑगस्ट २०१८ पूर्वी सादर करावी. जे कथा लिहून आणतील त्यांनाच विज्ञानकथालेखन कार्यशाळेसाठी प्रवेश दिला जाईल. त्यांच्या कथेवर कार्यशाळेत चर्चा होऊन तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळेल. कार्यशाळेत एकूण ३० व्यक्तींना प्रवेश देण्यात येईल. इच्छूकांनी मराठी विभागातील डॉ. मोना चिमोटे (९४२२१५५०८८), डॉ. हेमंत खडके (९८२२८४११९०), डॉ. माधव पुटवाड (९४२३७५०६०२), डॉ. प्रणव कोलते (९८५०४८८२२२) यांच्याशी संपर्क साधावा. तरी कार्यशाळेचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. मनोज तायडे यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०२/०८/२०१८.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी